30 JUL 2026
तरुण भारत



कोल्हापूर : श्रीकांत वालवडकर यांचे अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत सोबत डॉ. तृप्ती करेकट्टी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

# निवृत्त ग्रुप कॅप्टन श्रीकांत वालवडकर यांना पीएचडी

प्रतिनिधी,कोल्हापूर

भारतीय हवाई दलातील माजी हवाई योद्धा, प्रख्यात ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर (निवृत्त) यांनी शिवाजी विद्यापीठातून मानवविज्ञान विद्याशाखेतून इंग्रजी विषयातील पीएचडी पदवी संपादन केली. शिवाजी विद्यापीठाची पीएचडी प्राप्त करणारे ते पहिले हवाई योद्धा ठरले आहेत.

शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर २०२४ मध्ये भारतीय हवाई दलासोबत (इंडियन एअर फोर्स) सामंजस्य करार केला आहे. या करारांतर्गत सेवेत असलेल्या इच्छुक हवाई योद्ध्यांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमाचा लाभ घेत निवृत्त ग्रुप कॅप्टन वालवडकर यांनी १ जून २०२६ रोजी शिवाजी विद्यापीठातून ह्युमॅनिटीज या क्षेत्रातील इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी संपादन केली. 'इंडियन मिलीटरी ऑपरेशन्स – परसेप्शन अँड प्रेझेंटेशन इन सिलेक्टेड वॉर नॉन फिक्शन्स अँड वॉर मूव्हीज" या विषयावर त्यांनी विद्यापीठाला शोधप्रबंध सादर केला. त्यांना डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले.

30 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवृत्त हवाई योद्ध्याने मिळविली शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी.

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
भारतीय हवाई दलातील माजी हवाई योद्धा, प्रख्यात ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर (निवृत्त) यांनी १ जून २०२६ रोजी शिवाजी विद्यापीठातून मानवविज्ञान विद्याशाखेतून इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी संपादन केली. शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त करणारे ते पहिले हवाई योद्धा ठरले आहेत.

शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर २०२४ मध्ये भारतीय हवाई दलासोबत (Indian Air Force) सामंजस्य करार (MoU) केला आहे. या करारांतर्गत सेवेत असलेल्या इच्छुक हवाई योद्ध्यांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे देशसेवेबरोबरच शिक्षण घेण्याचीही संधी हवाई दलातील जवानांना मिळत आहे.



जवानांच्या शैक्षणिक उत्थानासाठी महत्त्वाचा असलेल्या या उपक्रमाचा लाभ भारतीय हवाई दलातील निवृत्त ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर यांनी घेण्याचे ठरवून इंग्रजी या विषयामध्ये पीएच.डी. संपादन केली. १ जून २०२६ रोजी शिवाजी विद्यापीठातून ह्युमॅनिटीज या क्षेत्रातील इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी संपादन करून या उपक्रमाचा लाभ घेतला आणि शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त करणारा पहिला माजी हवाई योद्धा होण्याचा मान मिळविला आहे. 'इंडियन मिलीटरी ऑपरेशन्स - परसेप्शन अँड प्रेझेंटेशन इन सिलेक्टेड वॉर नॉन फिक्शन्स अँड वॉर मूव्हीज' या विषयावर त्यांनी विद्यापीठाला शोधप्रबंध सादर केला. त्यांना डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीकांत वालवडकर यांनी हवाई दलात २७ वर्षे लढाऊ सैनिक अधिकारी (Combatant) म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली असून ३१ डिसेंबर २००९ रोजी स्वेच्छानिवृत्ती (Voluntary Retirement) स्वीकारली आहे.

देशसेवेनंतर शिक्षण क्षेत्रातही कॅप्टन वालवडकर यांनी मिळविलेले उल्लेखनीय यश सेवारत तसेच निवृत्त सैनिकांसाठी प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी त्यांचे अभिनंदन केले. भारतीय वायू दल आणि शिवाजी विद्यापीठाच्या या उपक्रमाचा वायु सेना अधिकारी आणि सैनिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. कामत यांनी आज ग्रुप कॅप्टन वालवडकर यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह डॉ. तृप्ती करेकट्टी, सौ. वालवडकर उपस्थित होत्या.

30 JUL 2026

वर्तमान

# निवृत्त हवाई योद्ध्याने मिळविली शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी.

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

भारतीय हवाई दलातील माजी हवाई योद्धा, प्रख्यात ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर (निवृत्त) यांनी १ जून २०२६ रोजी शिवाजी विद्यापीठातून मानवविज्ञान विद्याशाखेतून इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी संपादन केली. शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त करणारे ते पहिले हवाई योद्धा ठरले आहेत.

शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर २०२४ मध्ये भारतीय हवाई दलासोबत (Indian Air Force) सामंजस्य करार (MoU) केला आहे. या करारांतर्गत सेवेत असलेल्या इच्छुक हवाई योद्ध्यांना उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा शिवाजी विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे देशसेवेबरोबरच शिक्षण घेण्याचीही संधी हवाई दलातील जवानांना मिळत आहे.

जवानांच्या शैक्षणिक उत्थानासाठी महत्त्वाचा असलेल्या या उपक्रमाचा लाभ भारतीय हवाई दलातील निवृत्त ग्रुप कॅप्टन श्रीकांत बाळकृष्णराव वालवडकर यांनी घेण्याचे ठरवून इंग्रजी या विषयामध्ये पीएच.डी. संपादन केली. १ जून २०२६ रोजी शिवाजी विद्यापीठातून ह्युमॅनिटीज या क्षेत्रातील इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी संपादन करून या उपक्रमाचा लाभ घेतला आणि शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त करणारा पहिला माजी हवाई योद्धा होण्याचा मान मिळविला आहे. 'इंडियन मिलीटरी ऑपरेशन्स - परसेप्शन अँड प्रेझेंटेशन इन सिलेक्टेड वॉर नॉन फिक्शन्स अँड वॉर मूव्हीज' या विषयावर त्यांनी विद्यापीठाला शोधप्रबंध सादर केला. त्यांना डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीकांत वालवडकर यांनी हवाई दलात २७ वर्षे लढाऊ सैनिक अधिकारी (Combatant) म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली असून ३१ डिसेंबर २००९ रोजी स्वेच्छानिवृत्ती (Voluntary Retirement) स्वीकारली आहे.

देशसेवेनंतर शिक्षण क्षेत्रातही कॅप्टन वालवडकर यांनी मिळविलेले उल्लेखनीय यश सेवारत तसेच निवृत्त सैनिकांसाठी प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी त्यांचे अभिनंदन केले. भारतीय वायू दल आणि शिवाजी विद्यापीठाच्या या उपक्रमाचा वायु सेना अधिकारी आणि सैनिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. कामत यांनी आज ग्रुप कॅप्टन वालवडकर यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह डॉ. तृप्ती करेकट्टी, सौ. वालवडकर उपस्थित होत्या.

30 JUL 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात 'झोटेरो विथ एआय'वर मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने, मिडिया अँड कम्युनिकेशन क्लबच्यावतीने 'झोटेरो विथ एआय : स्मार्टर रेफरन्स मॅनेजमेंट फॉर अॅकॅडमिक रिसर्च' हे विशेष ऑनलाईन व्याख्यान झाले. याअंतर्गत गुजरात केंद्रीय विद्यापीठाचे सहाय्यक ग्रंथपाल व विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. भावेश पटेल यांनी शैक्षणिक संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि झोटेरो सारख्या संदर्भ व्यवस्थापन साधनांचा प्रभावी वापर कसा करावा, याविषयी प्रात्यक्षिकासह सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थानी ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार होते. डॉ. सुतार यांनी संशोधकांनी बदलत्या डिजिटल युगात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वाय. जी. जाधव यांनी परिचय करून दिला. उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी सुत्रसंचलन केले. प्रा. विनोद गुरव यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात, सुकेशानी कांबळे, डॉ. शिवाजी जाधव, प्रा. निशा मुढे-पवार, प्रा. अक्षय सरवदे उपस्थित होते.

3 0 JUL 2026
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रसाद कुलकर्णी. समवेत सखाराम माने, डॉ. शिवाजी जाधव, किसनराव कुराडे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# वसंतराव दत्तवाडे यांनी जपला मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श

## प्रसाद कुलकर्णी; डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे श्रद्धांजली कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्येष्ठ संपादक वसंतराव दत्तवाडे यांनी मर्यादित साधनसामग्री व कार्यक्षेत्र असूनही चार दशकांहून अधिक काळ मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रसाद कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. कुलकर्णी म्हणाले, इचलकरंजीसारख्या औद्योगिक शहरात दैनिक सुरू करून दत्तवाडे यांनी पत्रकारितेला सामाजिक बांधिलकीची दिशा दिली. नेहरूंच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांशी नाते सांगणारी त्यांची पत्रकारिता केवळ बातम्यांपुरती मर्यादित न राहता समाजात नवी मूल्ये रुजविणारी ठरली. पत्रकारितेची नैतिकता, प्रामाणिक भूमिका आणि वाचकांशी जिव्हाळ्याचे नाते यामुळे त्यांनी स्वतंत्र विश्वासार्ह स्थान निर्माण केले. त्यांच्या संपूर्ण पत्रकारितेवर सखोल संशोधन होण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. आलोक जत्राटकर, दयानंद लिपारे, प्रमोद व्हनगुत्ते, प्रा. सुनील देसाई आदींनी मनोगत व्यक्त केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सखाराम माने यांनी आभार मानले. डॉ. रत्नाकर पंडित, प्रेस क्लबचे उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, डॉ. जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर आदी उपस्थित होते.

30 JUL 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंतराव दत्तवाडे यांच्याकडून मर्यादित साधनातून अमर्याद पत्रकारितेचा आदर्श : प्रसाद कुलकर्णी



कोल्हापूर : मर्यादित भांडवल, मर्यादित साधनसामग्री आणि मर्यादित कार्यक्षेत्र असूनही 'दै. महासत्ता'चे दिवंगत संपादक वसंतराव दत्तवाडे यांनी चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत अमर्याद काम उभे केले. नेहरूंच्या राष्ट्रनिर्मितीच्या आदर्शाला अनुसरून माणूस घडविणे, पत्रकारितेची नैतिकता जपणे आणि नव्या पिढीला घडविणे, हे त्यांच्या कार्याचे मोठे वैशिष्ट्य राहिले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रसाद कुलकर्णी यांनी आज येथे केले. दत्तवाडे यांच्या पत्रकारितेवर सखोल संशोधन व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ संपादक वसंतराव दत्तवाडे यांचे नुकतेच निधन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री (कै.) डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात आज दत्तवाडे यांच्याविषयी श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून श्री. कुलकर्णी बोलत होते.

वसंतराव दत्तवाडे यांच्या पत्रकारितेचा कुलकर्णी यांनी व्यापक आढावा घेतला. ते म्हणाले, इचलकरंजीसारख्या औद्योगिक नगरीत दैनिक सुरू करणे ही मोठी जोखीम होती; मात्र दत्तवाडे यांनी ती जाणीवपूर्वक स्वीकारली. केवळ वृत्तपत्र चालवणे हा त्यांचा उद्देश नव्हता, (पान ३ वर)

# वसंतराव दत्तवाडे यांच्याकडून मर्यादित साधनातून अमर्याद पत्रकारितेचा आदर्श : प्रसाद कुलकर्णी

(पान १ वरुन) तर त्यातून परिसरातील सामाजिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक जीवनाला दिशा देणे, हे त्यांचे ध्येय होते. स्वातंत्र्यानंतर घडत गेलेल्या नव्या भारताच्या उभारणीच्या प्रक्रियेत दत्तवाडे यांची पत्रकारिता नेहरूंच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांशी नाते सांगणारी होती. नवा भारत घडविण्याचा नेहरूंचा आदर्श त्यांनी आपल्या पत्रकारितेतून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पुढे नेला. बातम्यांपुरते मर्यादित न राहता समाजातील नव्या मूल्यांची जडणघडण करणे, हा त्यांच्या पत्रकारितेचा गाभा होता.

दत्तवाडे यांच्या पत्रकारितेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पत्रकारितेची नैतिकता असल्याचे सांगून कुलकर्णी म्हणाले, मोठ्या भांडवली वृत्तपत्रांच्या स्पर्धेत न पडता, त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले. संपादकीय व्यापकता, प्रामाणिक भूमिका आणि वाचकांशी जिव्हाळ्याचे नाते यामुळे आपला विश्वासार्ह वाचकवर्ग निर्माण केला. स्थानिक प्रश्नांसह राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय घडामोडींवरही त्यांनी समतोल मांडणी केली. दत्तवाडे यांचे वैशिष्ट्य म्हणजे माणसे ओळखणे, घडवणे आणि त्यांना पुढे जाण्यासाठी पाठबळ देणे. अनेक पत्रकार त्यांच्या हाताखाली घडले, तिथून मोठ्या माध्यमांत गेले आणि संपादक म्हणून नावारूपाला आले. नवोदितांना जबाबदाऱ्या देणे, त्यांच्या लिखाणातील चमक ओळखणे आणि त्यांच्यात संपादकीय संस्कार रुजवणे, ही दत्तवाडे यांची खासियत असल्याचेही त्यांनी सांगितले. लेखकांना लिहिते ठेवणे, विविध विषयांवरील पुरवण्या चालवणे आणि स्थानिक तसेच व्यापक विषयांना जागा देणे, यात त्यांची दृष्टी ठळकपणे दिसते, असेही त्यांनी नमूद केले.

इचलकरंजी आणि परिसरातील सामाजिक शांतता, औद्योगिक समन्वय आणि सांस्कृतिक समृद्धी टिकविण्यात दत्तवाडे यांनी दिलेले योगदानही कुलकर्णी यांनी अधोरेखित केले. जात, धर्म, पक्षीय विचारसरणी यांच्या पलीकडे जाऊन समाजात व्यापक समन्वय टिकविण्याची त्यांची भूमिका महत्त्वाची होती, असे कुलकर्णी म्हणाले. त्यामुळे त्यांचे वृत्तपत्र परिसरातील सामाजिक जाणीवेचे महत्त्वाचे माध्यम बनले. वसंतराव दत्तवाडे यांच्या संपूर्ण पत्रकारितेवर सखोल संशोधन होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
30 JUL 2026
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंसाठी मानसशास्त्र, योग्य पोषण आणि नैतिकता महत्त्वाची

## अवंती दामले यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** खेळाडूंनी उत्तम कामगिरीसाठी शारीरिक तयारीबरोबरच क्रीडा मानसशास्त्र, योग्य पोषण आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित ''क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग'' या विषयावरील चर्चासत्रात त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते. दामले यांनी योग्य आहार, पुरेशी झोप, नियमित सराव आणि स्मार्टफोनचा मर्यादित वापर यादर भर देत डोपिंगपासून दूर राहण्याचे आवाहन केले. फिजिओथेरपिस्ट डॉ. यशवंत वेलणकर यांनी मानसिक तयारी, एकाग्रता आणि स्वयंप्रेरणेचे महत्त्व स्पष्ट केले. व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे म्हणाले, खेळाचे मानसशास्त्र खेळाडूंना त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास आणि आत्मविश्वासाने खेळण्यास मदत करते.

क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील आणि अजय मराठे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांच्यासह क्रीडा प्रशिक्षक सविता भोसले, डॉ. अतुल टोने, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. सुजित नाईक, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. रामचंद्र पाटील, आदी उपस्थित होते.

30 JUL 2026
क्रांतीसिंह

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा कौशल्यासाठी हुबळी ट्रस्ट बरोबर करार

कोल्हापूर(प्रतिनिधी):- विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला, रोजगार क्षमतेला आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट, हुबळी (कर्नाटक) यांच्यात नुकताच त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास, पुनर्कौशल्य आणि कौशल्यवर्धन यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देऊन त्यांची रोजगार क्षमता, व्यावसायिक क्षमता आणि करिअरसाठीची तयारी अधिक सक्षम करणे, हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे. यावेळी देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. नायक म्हणाले, देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचा 'देशपांडे स्किलिंग' हा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, त्याचे मुख्यालय हुबळी (कर्नाटक) येथे आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. प्रामुख्याने आवश्यक व्यक्तिमत्त्व विकास व औद्योगिक कौशल्ये या अनुषंगाने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. या करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार असून, विद्यापीठाच्या 'कुशल, सक्षम आणि उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्मिती' या उद्दिष्टाला निश्चितच बळकटी मिळेल. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या कामी हा करार महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. या सामंजस्य करारावर नायक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संचालक डॉ. सागर डेळेकर, रवी चव्हाण, एम. बी. शेख, रवी डोळी, डॉ. हेमराज यादव, सुभाष माने यांच्यासह तिन्ही संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.